नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०१/२०२६ (शनिवार)**

---

## परमात्मा एक सेवक मानव धर्म पावडदौना येथे कार्यक्रम स्थळी मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची भेट

दरवर्षी प्रमाणे पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत परमात्मा एक सेवक मानव धर्म आश्रम पावडदौना या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग ५३ लगत दिनांक २६/०१/२०२६ रोजी मानव धर्म भव्य सेवक मेळावा कार्यक्रमाचे आयोजन आहे. सदर ठिकाणी महारष्ट्र,गोवा सह मध्यप्रदेश, छत्तीसगढ, गुजरात व इतर राज्यातुन मोठया प्रमाणात जनसमुदाय उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सदर कार्यक्रम स्थळी दिनांक २३/०१/२०२६ रोजी मा.श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी भेट दिली. सदर ठिकाणी मा. पोलीस अधिक्षक यांनी कार्यक्रम स्थळ, वाहन पार्कींग जागा आणि रस्त्यांची पाहणी केली. मा. पोलीस अधिक्षक यांनी सर्वाना बंदोबस्त बाबत महत्त्वाच्या सुचना दिल्या. तसेच मा. पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनात नमुद ठिकाणी योग्य बंदोबस्त लावण्यात आला आहे.

नमुद ठिकाणी श्री संतोष गायकवाड उपविभागिय पोलीस अधिकारी कन्हान उपविभाग, पोलीस स्टेशन मौदा चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे आणि परमात्मा एक आश्रम येथील कार्यक्रमाचे आयोजिक समिती सदस्य हजर होते.








## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
## ७ लाख ७ हजार ९०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## २ आरोपी अटक, नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक २३/०१/२०२६ रोजी नरखेड पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड पोलीसांनी सतर्कतेने पेट्रोलींग करून सिंदी शेत शिवार येथे संशयीत वाहन स्कॉर्पीओ वाहन क्रमांक एम.एच ४० ए.आर. ३२४८ हे वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **वाहन चालक आरोपी नामे प्रतिक कांचन गजभिये, वय २८ वर्ष, रा. प्लॉट नं. ३६ पठाण लेआऊट त्रिमुर्ती नगर, नागपूर आणि त्याचा साथीदार २) देवेंद्र धनराज कडवे, वय ३५ वर्ष, रा. गुरूदत्त सोसायटी एस.डि.पी.एल. अपार्टमेंट जवळ दाभा, वाडी, नागपूर हे मिळुन आले.**

पोलीसांनी पंचासमक्ष ३७ पोत्यांमधील विविध ब्रॅड चे ४०७ किलो प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखु किंमती २,०७,९००/—रूपये आणि स्कॉर्पीओ वाहन क्रमांक एम.एच ४० ए.आर.

३२४८ किंमती ५,००,०००/—रूपये असा एकुण **७,०७,९००**/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे नरखेड येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**







# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २३/०१/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा माथनी टोल गेट येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्र. एम.एच ४० सी.डब्ल्यु ९७९६ हे वाहन मिळुन आले. वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **आरोपी क्रं १.वाहन चालक कमलेश लक्ष्मण गोंदुळे,वय ३८ वर्षे,रा. वार्ड क्र. ०७ पटेल नगर कन्हान हा मिळुन आला.** नमुद आरोपीला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे

कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं २) शुभम गुणवंता रडके, वय २६ वर्षे, रा. मसाळा, ता. कामठी** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची वाहतुक करीत असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष टिप्पर क्र. एम.एच ४० सी.डब्ल्यु ९७९६ किंमती ३०,००,००० /—रूपये आणि १० ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण ३०,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम ,कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री, वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १४ गुन्हे नोंद एकुण १,०४,२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २३/०१/२०२६** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, दुचाकी वाहन असा एकुण १,०४,२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी  येथे २ गुन्हे, पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे २ गुन्हे, पोलीस स्टेशन बेला येथे १ गुन्हा , पोलीस स्टेशन नरखेड २ गुन्हे,. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे, , पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हा, पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे २ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हा नोंद आहे. **अशा १४ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १४ गुन्हे दाखल केले आहे.**

**१) १०२० लिटर मोहाफुल सडवा रसायन ,२) ३८ लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ३) ३७२६० मिली देशी दारू ,४)  मोटर सायकल इतर साहित्य असा एकुण १,०४,२१०/— रूपयांचा मुद्देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७४३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २४/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार

गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७४३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २८ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २९ आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३३ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३२ आरोपी अशा एकुण ६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २६ आरोपी अशा एकुण १४१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १७५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने